# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


३३९ - २३ दिनांक : - ०३/१०/२०२३

## जबरी चोरी करणा-या सराईत आरोपीतास पकडण्यात गुन्हे शाखा, कक्ष-3 विरार यांना यश.

दिनांक २५/०९/२०२३ रोजी सकाळी ०६.३५ वाजताचे सुमारास फिर्यादी नामे - श्रीनिवास नगीना शुक्ला वय ६७ वर्ष हे विरार पश्चिम विवा कॉलेज जवळ डी मार्ट समोरील रोडवर पायी चालत असताना मोटार सायकल वरील एक अनोळखी अंदाजे ३५ ते ४० वर्षे वयोगाटातील इसम अंगात गडद चॉकलेटी रंगाचा शर्ट परिधान केलेला याने अचानक फिर्यादीच्या समोरुन येवुन फिर्यादीच्या गळ्यातील ३०,०००/- रु.कि.ची १३ ग्रॅम वजनाची सोन्याची चैन जबरदस्तीने खेचुन विरार रेल्वे स्टेशन बाजुकडे पळुन गेला म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अर्नाळा सागरी पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर ३१२/२०२३ भा.द.वि.सं. कलम ३९२ प्रमाणे गुन्हा नोंद आहे.

मिरा भाईदर वसई विरार पोलीस आयुक्तालयातील वसई विरार परिसरात गेल्या काही महिन्यापासुन जबरी चोरीचे प्रमाण वाढल्याने सदर घटनांची मा. वरिष्ठांनी गांभिर्याने दखल घेवुन आरोपीत यांचा शोध घेवुन पायबंद करणे बाबत सुचना दिल्या होत्या.

सदर गुन्हे अनुषंगाने मा. पोलीस उप आयुक्त गुन्हे, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे यांनी दिलेल्या सुचना व आदेशान्वये सदर गुन्हयाचा तपास गुन्हे शाखा कक्ष -३ कडे देण्यात आला. सदर गुन्हयाचा तांत्रीक विश्लेषण व गुप्त बातमीदार यांचेकडून आरोपीत बाबत गोपणीय माहिति प्राप्त करुन आरोपीत नामे - अनुज गंगाराम चौगुले वय - ३३ वर्षे, विरार पुर्व, ता. वसई, जि पालघर यास दिनांक २९/०९/२०२३ रोजी ताब्यात घेण्यात आले त्याचे कडे कौशल्यपुर्वक तपास करता त्याचे कडुन गुन्हयात वापरलेले वाहन व जबरी चोरी केलेली सोन्याची चैन असा १,९५,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करुन गुन्हातील आरोपीत याचा सहभाग निष्पन्न करण्यात आला असुन आरोपीत हा सद्या पोलीस कोठडी आहे.

पोलीस कोठडी दरम्यान नमुद आरोपीत याचा पुर्व इतिहास पडताळुन पाहता उक्त आरोपीत विरुध्द मुंबई शहर आयुक्तालय, सातारा, पालघर, मध्यप्रदेश येथे सुपारी घेवुन खुन करणे, दरोडा, जबरी चोरी, पोलीस कोठडीतुन पळुन जाणे, तसेच चोरी असे २५ पेक्षा जास्त गुन्हे दाखल असुन त्यापैकी गंभीर स्वरुपाचे खालील प्रमाणे गुन्हे दाखल आहेत.

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गुन्हा रजि नंबर व कलम |
|---|---|---|
| १ | नवघर पोलीस ठाणे (मुंबई शहर) | १०५/२०११ भा.द.वी.सं. कलम ३९५, ३९७, ४५२, ३४२, १२०(ब), सह भारतीय हत्यार कायदा कलम ३, (२५), महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम १९९९ कलम ३ (१) (i), ३ (१) (ii), ३ (२), ३ (३), ३ (४) |
| २ | महाबळेश्वर पोलीस ठाणे (सातारा) | १७/२०११ भा.द.वी.सं. कलम ३०२, ३९२, ३९७, ४५२,२०१, ३६५,४२७, ३४२, १७१, ३२३, १०९, १२०(ब), ७५, ३४ सह भारतीय हत्यार कायदा कलम ३, २५,५(२७)प्रमाणे |
| ३ | डी.सी.बी. सि.आय.डी (मुंबई शहर) | ७३/२०११ भा.द.वी.सं. कलम ३९९,४०२,४६५,४६८,४७१, ४७४,४१९,४२०, सह भारतीय हत्यार कायदा कलम ३, ४, २५ |

| | | |
|---|---|---|
| ४ | सायन पोलीस ठाणे (मुंबई शहर) | १९१/२०११ भा.द.वी.सं. कलम ३९५, ३९७, ४५२,३४ प्रमाणे |
| ५ | विक्रमगड पोलीस ठाणे (पालघर) | २२/२०१२ भा.द.वी.सं. कलम ३९२, ३९७, ३४ सह भारतीय हत्यार कायदा कलम ३, २५,प्रमाणे |
| ६ | जव्हार पोलीस ठाणे (पालघर) | ५६/२०१२ भा.द.वी.सं. कलम २२४,३४ प्रमाणे |
| ७ | कोयनानगर पोलीस ठाणे (सातारा) | १७/२०१६ भा.द.वी.सं. कलम ३९४, ३४, १२०(ब), सह भारतीय हत्यार कायदा कलम ३, (२५), महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम १९९९ कलम ३ (१) (i), ३ (१) (ii), ३ (२), ३ (३), ३ (४) अन्वये |

वरील कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त सो., (गुन्हे), श्री. अमोल मांडवे सहा.पोलीस आयुक्त सो., (गुन्हे) मि.भा.वि.व पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि. प्रमोद बडाख, पो.उप.निरी. अभिजीत टेलर, उमेश भागवत, पो.हवा. अशोक पाटील, मनोज चव्हाण, मुकेश तटकरे, सचिन घेरे, सागर बारावकर, मनोज सकपाळ, अश्विन पाटील, पो.अं. राकेश पवार, सुमित जाधव, सुनिल पाटील, युवराज वाघमोडे, म.सु.ब. प्रविण वानखेडे, सागर सोनवणे, गणेश यादव सर्व नेमणुक गुन्हे शाखा कक्ष -३ तसेच स.फौ. संतोष चव्हाण नेम सायबर सेल यांनी उकृष्टरित्या पार पाडली आहे.

